<u>राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम</u>
केंद्र हिश्श्यांतर्गत अनुसूचित जाती उपयोजना या घटकासाठी कव्हरेज, पाणी गुणवत्ता व देखभाल दुरुस्ती या अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी पुरवठा योजनांसाठी अनुदाने (लेखाशिर्ष-२२१५ ९८४४)

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक : राग्रापे-२०१७/प्र.क्र.८२ (भाग-१)/पा.पु.१०
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई-४०० ००१.
दिनांक : ०४ डिसेंबर, २०१७

<u>वाचा</u>- (१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापाधो-१९०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-७, दिनांक १७ मार्च, २०१०.
(२) केंद्र शासनाचे पत्र क्र.W-११०२०/१९७/२०१५-Water-I/५२, दिनांक ०९.०८.२०१७.
(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. विघयो-२०१०/प्र.क्र.२६/विघयो, दि.१३.०४.२०१७.

<u>प्रस्तावना-</u>

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून अनुसूचित जाती उपयोजना या अंतर्गत प्राप्त झालेल्या केंद्र हिश्श्याच्या अनुदानासंदर्भात आर्थिक वर्षा २०१७-१८ मध्ये मागणी क्र. वाय-०२, लेखाशिर्ष २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ७८९, अनुसूचित जातींकरीता विशेष घटक योजना, ०१ अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत योजना, (०१) (०१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (अनुसूचित जाती उपयोजना) (केंद्र हिस्सा), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२१५ ९८४४) या लेखाशिर्षाखालील अंमलबजावणी यंत्रणांना कव्हरेज, पाणी गुणवत्ता, देखभाल व दुरुस्ती या अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी अनुदाने मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांकरीता उपरोक्त घटकांसाठी लेखाशिर्ष २२१५ ९८४४ या खाली रु.१,२८,८३,०००/- (रुपये एक कोटी अठ्ठावीस लक्ष त्र्याऐंशी हजार मात्र) एवढा निधी जिल्हा परिषद, अहमदनगर यांना अर्थसंकल्प प्रणालीद्वारे (BEAMS) पुढील अटींवर मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

अटी:-

अ) संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी हे अनुदान सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात केवळ अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या सुचनेनुसार ग्रामीण भागातील अनुसूचित जातींचे प्राबल्य असलेल्या (Rural habitations having majority of/Dominated by SC Population) भागांमधील नळ पाणी पुरवठा योजनांसंदर्भात कव्हरेज, पाणी गुणवत्ता, देखभाल व दुरुस्ती या घटकासाठी केंद्र शासनाने व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार खर्च करावयाचे आहे.

ब) संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी या अनुदानातून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.

क) वरील अटी/शर्तींची संबंधित अंमलबजावणी यंत्रणांकडून पुर्तता होत आहे ह्याची शासनाला खात्री करुन घेता यावी म्हणून महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर यांना तसेच या विभागातील प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास लेखा परिक्षणाकरीता संबंधित अंमलबजावणी यंत्रणांची पुस्तके व लेखे पाहण्याचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम योग्य तऱ्हेने पार पाडता यावे म्हणून संबंधित अंमलबजावणी यंत्रणा संपूर्ण मदत व सुविधा पुरवतील.

ड) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.आरसीएन-१८९/सी.आर.३०२७/ २८, दि. ०५/०९/९० मधील सुचनेप्रमाणे सदर अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व ताळमेळाचे अहवाल विहित दिनांकांना संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी विभागीय आयुक्त (विकास शाखा), यांना व कार्यासन पापु-१०/पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करावे. त्याचप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालय, मुंबई/नागपूर व पापु-१० कार्यासनास सादर करावे.

इ) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कव्हरेज व गुणवत्ताबाधीत याखाली हाती घेतलेल्या योजनांसाठीचा खर्च हा ५०% केंद्र निधीतून व ५०% राज्य निधीतून करणे आवश्यक आहे.

ई) केंद्र व राज्य हिश्श्यातून केलेल्या खर्चाची नोंद न चुकता, IMIS या प्रणालीवर पुढीलप्रमाणे नोंद घेण्यात यावी तसेच सदर नोंदी पुढीलप्रमाणे वेळोवेळी अद्ययावत करण्यात याव्यात.

क. भौतिक दृष्ट्या १००% पूर्ण परंतु आर्थिक दृष्ट्या अपूर्ण योजना.
ख. > ७५ ते < १००% भौतिक दृष्ट्या पूर्ण.
ग. < ५० ते ७५%> भौतिक दृष्ट्या पूर्ण.
घ. < २५ ते ५०%> भौतिक दृष्ट्या पूर्ण.

उ) तसेच BDS प्रणालीवर मुक्त केलेली रक्कम संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी त्वरीत संबंधित कोषागारातून काढण्याची कार्यवाही करावी. कोषागारातून रक्कम वेळीच न काढली गेल्यास तसेच सदर रक्कम या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी न वापरण्यात आल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांची राहील.

ऊ) सर्वप्रथम, राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना यापूर्वी उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीमधून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी करण्यात आलेला सर्व खर्च प्रथम आयएमआयएस प्रणालीवर अद्यावत करण्यात यावा. जिल्ह्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार देयक तयार असलेल्या पाणी पुरवठा योजनांसाठी निधी मागणी असल्याने वितरीत करण्यात आलेला निधी सदर योजनांवरच खर्च करण्यात यावा. तसेच केंद्र हिश्यांतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी पाणी पुरवठा योजनांना वितरीत करतांना केंद्र शासनाच्या आयएमआयएस संकेतस्थळावर खर्चाची नोंद होत असल्याची खात्री करण्यात यावी.

ऋ) सदर निधी सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७ आणि २०१७-१८ या वर्षाच्या कृती आराखड्यात समाविष्ट असलेल्या गावांच्या योजनांसाठीच खर्च करावा. तसेच उपलब्ध करून देण्यात आलेला निधी उपयोगात आणण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून खर्चाचे नियोजन करावे व उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास वेळीच सादर करावीत.

ऌ) या संदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भाधिन दिनांक १३.०४.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घ्यावी.

२. यावर होणारा खर्च मागणी क्र. वाय-०२, लेखाशिर्ष २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ७८९, अनुसूचित जातींकरीत विशेष घटक योजना, ०१ अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत योजना, (०१) (०१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (अनुसूचित जाती उपयोजना) (केंद्र हिस्सा), ३१ सहाय्य अनुदाने (वेतनेतर) (२२१५ ९८४४) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१७-१८ साठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक दि. २०.०४.२०१६ अनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर प्रकरणी वित्त विभाग परिपत्रक दिनांक १८.०४.२०१७ मधील अनुक्रमांक ७ ते १८ येथील अटींची तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील क्र. ३ ते ८ येथील बाबींची पुर्तता होत आहे याची अंमलबजावणी यंत्रणेने खातरजमा करावी. उपरोक्त रु.४७.३६७९ कोटी एवढा केंद्र निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाल्याबद्दलची खात्री वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेकडून करण्यात आलेली आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७१२०५१७०६४७६५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Chandrakant Krishna More

Digitally signed by Chandrakant Krishna More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea4271090267228122b638d6f2cdedad62, serialNumber=2314cf333e070f9936792bc95890fa89b2f617a931b2b577b703fa858f3df433, cn=Chandrakant Krishna More
Date: 2017.12.05 17:10:05 +05'30'

(चं. कृ. मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
३) महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
४) नियोजन विभाग (कार्यासन-१४४३)/वित्त विभाग(व्यय-३), मंत्रालय, मुंबई.
५) सर्व विभागीय आयुक्त,
६) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,द अहमदनगर
८) उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पाणी व स्वच्छता) सर्व जिल्हा परिषदा
९) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१०) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, सर्व जिल्हा परिषदा,
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई.
१४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कार्यासने क्र. पा.पु.४, पा.पु. २०.